# <u>चतुर</u>

मी जे केले ते का केले
दुसरे का नाही केले
कारण ते आवडले
दुज्याविना ना अडले

नड आवड ही दोनच
आहेत कारणे द्योतक
जबाबदार आपण
कार्याला आपुल्याच

पण आपण चतुर
परीणामाला आतुर
चांगला श्रेय स्वतःला
वाईट दोष दुज्याला

– नारायण
०९/१२/२३